# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना:-**

**विषय :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मौजे ईदगाह रोड येथे कत्तलखाना सुरु करणेबाबत..

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मौजे ईदगाह रोड येथे कत्तलखाना सुरु करणेबाबतच्या बीओटी तत्वावर निविदा मागविणे कामी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४ दि.०६ जुन २०२ रोजी नुसार मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यांत आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार प्रसाकिय ठराव व निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा.प्रशासक सो. यांना आहेत.

ठराव क्र. ९५२ दिनांक :- २६/४/२०२३

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मौजे ईदगाह रोड येथे कत्तलखाना सुरु करणेबाबतच्या बीओटी तत्वावर निविदा मागविणे कामी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करणे कामीच्या प्रस्तावास शहर अभियंता, अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२)नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मौजे ईदगाह रोड येथे केवळ स्थानिक गरज भागविण्यासाठी कत्तलखाना सुरु करणेबाबतच्या बीओटी तत्वावर निविदा मागविणे कामी तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करणे कामीच्या प्रस्तावास मा.प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका